दैनिक

# विदर्भ कल्याण

यवतमाळ जिल्हा विशेष

गुरुवार,
२८ सप्टेंबर २०२३


## झरी तालुक्यात हायवाने रेती तस्करी

### पाटण दिग्रस ,चंद्रपूर व गणेशपुर (खडकी) पांढरकवडा, येथील चोरटे सक्रिय

**विदर्भ कल्याण / झरी**

तालुक्यात गेल्या एक महिन्यापासून खुलेआम हायवा भरून चोरीच्या रेतीची खुलेआम तस्करी सुरू आहे. याकडे संबंधित विभाग हेतू पोलीस पर दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे.

झरी तालुक्यातील पाटण गणेशपुर ( खडकी) येथून विना रायटिंग चोरीची रेती खुलेआम दिवस-रात्र मुकुटबन अडेगाव पाटण झरी लिंगटी जामणी शिबला माथार्जुन, मांगली गणेशपुर कोसरा व इतर ठिकाणी आठ ते दहा हजार रुपये ब्रास प्रमाणे विक्री केल्या जात आहे. चंद्रपूर वरून एक ठेकेदार हा गणेशपुरी येथील त्याच्या खदानित रेतीचा स्टॉक करून दोन ब्रास च्या चार चाकी वाहनाने वरील परिसरात रात्री रेतीची विक्री करीत आहे चंद्रपूर येथील हा व्यक्ती मुरूमची सुद्धा विक्री करीत आहे. कमी ब्रास ची रॉयल्टी काढून जास्त ब्रासची विक्री करत असल्याची माहिती आहे. सर्व प्रकार महसूल सह पोलिसांना सुद्धा माहीत असून याकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. या संबंधित विभागाला वरील सर्व रेतीचोरट्यांकडून मोठी रक्कम दिल्या जात असल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे हे तीन चारच रेती चोरट्यांना कोणी अधिकार दिला असाही संतप्त प्रश्न जनता करीत आहे. विशेष म्हणजे यातील काही रेती चोरटे हे राजकीय पदाधिकारी असून त्यांना वरिष्ठ नेत्यांचा सपोर्ट आहे. त्यांच्या रेती चोरी करिता संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना नेत्यांनी फोन करून रेतीचा व्यवसाय करू द्या असे सांगितल्याची माहिती मिळत आहे. रेती चोरीमध्ये राजकीय वरदस्त असल्यामुळे खुल्या चोरी केलेली रेती विक्री करून लाखो रुपये जमवली जात आहे. तेलंगानातील अनंतपुर येथून जेसीबीने दोन रास सहा ब्रास व मोठ्या हायवा भरून तसेच चंद्रपूर येथून मोठ्या हायवाने रेतीची तस्करी केल्या जात आहे याकडे महसूल पोलीस विभागाने त्वरित लक्ष देऊन या रेती चोरीच्या चार चाकी वाहनांवर कार्यवाही करून वाहन मालकांकडून दंड वसूल करावे . गुन्हे दाखल करावे अशी मागणी होत आहे. हायवा ट्रकने येणारे रेती काही तरुण पकडून पोलीस किंवा महसूलच्या हवाले करण्याचा निर्धार केला आहे. तसेच सिंधी वाढोणा, दरा, साखरा, पठारपूर, येडशी, अडेगाव, मुकुटबन येथील काही तस्करही रेती ट्रॅक्टर सुद्धा रेतीची तस्करी मोठ्या प्रमाणात करीत आहे.

### 29 कृत्रिम तलावाची निर्मीती तर 12 विहिरी सज्ज : गुरुवार पासून गणेश विसर्जन

## कृत्रिम तलावात होणार बाप्पांचे विसर्जन

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

सार्वजनिक तसेच घरगुती गणरायाचे आगमन मोठ्या भक्तीभावाने करण्यात आले आहे. मागिल 9 दिवसापासून गणपती घरोघरी विराजमान आहे. आता आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्याची वेळ आली. उद्या अनंत चर्तूदशीला गुरूवार 28 स्पप्टेंबरला पासुन बाप्पांना निरोप देण्यात येणार आहे. या अनुषंगाने नगर पालिका प्रशासन सज्ज झाले असून शहरात 29 कृत्रिम तलावांसह 12 पारंपारिक सार्वजनिक टाके व विहीरी सज्ज करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात आनंद आणि उत्साहाच्या वातावरणात 'श्री' गणेशाचे आगमन झाले. सर्वत्र सार्वजनिक व घरगुती गणेश उत्सव पर्यावरण पूर्वक साजरा करण्यावर भर दिला गेला. त्यानंतर आता दहा दिवसाच्या बाप्पाला निरोप देण्याची वेळ आली आहे. गुरुवारी 28 सप्टेंबरला अनंत चतुर्दशीच्या दिवशी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. त्याकरीता दरवर्षीप्रमाणे यंदाही नैसर्गिक जलस्त्रोतातील वाढते प्रदूषण लक्षात घेऊन नैसर्गिक संवर्धनासाठी नगर पालिका प्रशासनाकडून विसर्जना करीता विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शहरातील गणपती विसर्जनासाठी विविध प्रभागात एकूण 29 कृत्रिम विसर्जन तलावाची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच तयार करण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन तलावाजवळ प्रत्येक प्रभागात दोन ट्रॅक्टरची व्यवस्था करण्यात आली आहे. जेणेकरून पीओपीच्या मूर्ती वेगळ्या करण्यात येतील. यासाठी प्रत्येक कुंडावर दोन कर्मचाऱ्यांची देखिल नियुक्ती करण्यात आली आहे.



**येथे तयार केले कृत्रिम कुंड**

प्रभाग 1 मध्ये नरिंगी नगर, गिराजा नगर, चांदोरे नगर, प्र. क्र.3 मध्ये साई नगर, भातृ मंडळाच्या आवारात, प्र.क्र. 4 अनुश्री पार्क, ढोले ले आऊट, प्र. क्र. 5 संजय गांधी शाळा,आदर्श नगर, प्र.क्र. 6 कामगार नगर,प्र. क्र.10 वाघापुर ग्रामपंचायतच्या आवारात प्र.क्र.13 डायाभाई पटेल शाळा, प्र.क्र. 14 लोहारा महादेव मंदीराच्या आवारात, प्र.क्र. 15 मध्ये जयविजय चौक, प्र.क्र. 16 अग्निशमन कार्यालय जवळ, प्र. क्र. 17 मध्ये सुनिता बिल्डींग, शिवाजी ग्राऊंड मध्ये, प्र. क्र. 18 संत ज्ञानेश्वर मंदीर जवळ, प्र. क्र. 19 साई मंदीराजवळ, प्र. क्र.22 रवि नगर, संकट मोचन टाके, प्र. क्र. 23 रंगोली ग्राऊंड, लक्ष्मी नगर मध्ये, प्र.क्र. 27 तिरुपती नगर, गुरुनानक नगर मध्ये, प्र. क्र. 28 वाघाडी गुरुद्वारा जवळ, प्र.क्र 13 मध्ये ग्रामपंचायत वाघापुर, प्र.क्र 26 दत्तात्रय नगर, प्र.क्रं 25 कमळेश्वर मंदिर लोहारा, गणपती मंदिर प्रजापती नगर अशा एकूण 29 ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली आहे.

या विहिरीमध्ये होणार विसर्जन लकडगंज विहिर, गवळीपुरा विहिर, बालाजी चौक विहिर, शनी मंदीर चौक विहिर, स्वावलंबी शाळा, विठ्ठल रूख्मीनी मंदिर वडगांव, महिला महाविद्यालय टाके, अमराई पुरा टाके, पिपळगांव पुलाजवळ विहिर, बालाजी मंगल कार्यालय रायभोर नगर वाघापुर, पिपळगांव विहिर, कॉटन मार्केट चौक गणपती मंदीर येथे करण्यात आले आहे.

## खविसंच्या माध्यमातून शेतक-यांच्या विकासासाठी प्रयत्न करु : विजय वानखेडे

**विदर्भ कल्याण / उमरखेड**



अमरावती विभागामध्ये येथील खरेदी विक्री संघ सर्वाधिक शेतकरी सभासद असलेल्या संस्थेची वाटचाल विदर्भात दुसऱ्या स्थानावर होती. मधल्या काळामध्ये संस्थेची आर्थिक परिस्थी नाजुक झाल्याने फारसा विकास होवु शकला नाही. परंतू या तीन महीन्याच्या काळात नव्याने संचालक मंडळ स्थापीत झाल्याने सर्वांच्या समन्वयातून खत बि बियाने यासह शेतकरी यांचा विकास करण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न राहणार आहे असे प्रतिपादन अध्यक्ष विजय वानखेडे यांनी केले. या आमसभेला माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, माजी आमदार विजय खडसे, दतराव शिन्दे, प्रदीप देवसरकर, कुष्णा पाटील देवसरकर, राजु जयस्वाल, रमेश चव्हाण, ॲड. संतोष जैन, चितांगराव कदम, बळवंत नाईक, प्रज्ञानंद खडसे, गणेश नरवाडे, भिमराव चंद्रवंशी, रमन रावते, शामराव वानखेडे, सतिष नाईक, छबूराव धोपटे, प्रकाश नरवाडे, अँड बळीराम मुटकुळे, सुदर्शन रावते, खॉजा कुरेशी, किसणराव वानखेडे, शंकर तालंगकर, विनायक कदम, उत्तम कनवाळे, तानाजी चंद्रवंशी, सुधाकर लाहेवार यासह संस्था संचालक उपस्थित होते. आमसभेत डॉ गणेश घोडेकर, सुर्यकांत पंडीत, हरीभाऊ बेले, भाऊराव चव्हाण, श्रीधर देवसरकर उपस्थित होते. आमसभेचे वाचन सचिव विजय माने यांनी केले.



**विदर्भ कल्याण / बाभुळगाव**

तालुक्यातील आसेगाव देवी येथील बाल गणेश उत्सव यांनी साकारलेला देखणा मंडप.

## गणरायाचे मनमोहक बालरुप



**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

शहरातील गिलानी नगरातील सुरेश रामचंद्र शहाडे यांनी त्यांच्या घरात बाळ गणेश माता पार्वतीला घरकामात मदत करत असल्याचा देखावा साकारला आहे. यंदाचे त्यांचे 24 वे वर्ष आहे. ही मूर्ती मूर्तिकार ओम सांबजवार यांनी साकारली आहे.

## अखेर मानव विकासची बस सेवा सुरु

**विदर्भ कल्याण / पाटणबोरी**

पाटणबोरी येथून 12 किलो मीटर अंतरावर असलेल्या तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या गावातील विद्यार्थीनींना पाटणबोरी येथे शिक्षण घेण्यासाठी यावेळी लागते. परंतु बस सेवा नसल्याने प्राव्हेट गाड्यानी शिक्षणा साठी यावे लागत होते. मात्र रुढा खैरी येथील सरपंच मनीषा कोडापे, उपसरपंच पवन निलगिरवार यांच्या अथक परिश्रमाने येथील 14 विद्यार्थीनींना आदिवासी मानव विकासाची बस सेवा सुरु करण्यात आली.

पूर्वी ही बस कोदोरी गावा पर्यंत सेवा देत होती. रुढा, खैरी येथील सरपंच, उपसरपंच व गावातील अनिल निलगिरवार, वामन निरंजन मडावी, रवी कनाके यांच्या मार्गदर्शनाने पांढरकवडा आगारा प्रमुखला निवेदन दिले होते. यापूर्वी आमदारांना व यवतमाळ आगार प्रमुख यांना निवेदन दिले. मात्र, आज पर्यंत सेवा सुरु करण्यात आली नाही. पांढरकवडा येथील रवी कनाके यांच्या मार्गदर्शनाने पांढकवडा आगार प्रमुखला भेटून विनंती अर्ज केल्याने रुढा, खैरी या गावातील विद्यार्थिनींना बस सेवा सुरु करण्यात आली. दिनांक 25 सप्टेंबर 2023 रोजी बस सेवा सुरु करण्यात आली. यावेळी सरपंच मनीषा कोडापे यांनी बस चालक चिंताकुटलावर यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत केले. तर उपसरपंच पवन निलगीलवार यांनी वाहकाचे स्वागत केले. यावेळी अनिल निलगिरीवार, वामन निरंजन मडावी उपस्थित होते.



## रमेश बिधूरी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करा



**विदर्भ कल्याण / आर्णी**

लोकसभेत एका चर्चे दरम्यान बीजेपीचे लोकसभा सदस्य रमेश बिधूरी याने बसपाचे लोकसभा सदस्य दानिश अली यांना उद्देशुन अक्षेपार्ह विधाने केले. सदर विधाने भारतीय लोकशाही व संसदीय परंपरेला काळीमा फासणारी व समस्त मुस्लिम समाजा च्या भावना दुखावनारी आहे. रमेश बिधूरी याने केलेल्या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला. बिधुरी यांना तत्काल निलंबित करुण त्याचे लोकसभा सदस्यत्व रद्द करावे अशी मागणी मुस्लिम बांधवांसह एमआयएमने केली आहे. या बाबतचे निवेदनही तहसीलदार मार्फ़त प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्षांना देण्यात आले. यावेळी आर्णी नगर परिषदचे माजी उपनगराध्यक्ष कादर ईसानी, माजी बांधकाम सभापती अनवर पठान, सलीम बेग, पत्रकार आबिद फानन, आरिफ शेख, जाफर शेख, मुजफ्फर भाई, आरिफ पठान, रियाज़ सय्यद, समद पहेलवान, एम आय एम यूथ अध्यक्ष आरिफ खान, तालुका प्रवक्ते अली खान, सय्यद अमीन, मतीन खान,फैजान शेख, अरबाज़ शेख, हुज़ैफ़ा शेख व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**विदर्भ कल्याण / पांढरकवडा**

लग्नाचे अमिष दाखवत चार वर्षापासून शारिरीक संबंध ठेवत मुलीचे शोषण केले. ऐनवेळी लग्न करण्यास नकार दिल्याने मुलीच्या तक्रारीवरुन पांढरकवडा पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात अत्याचाराचा गुन्हा नोंद करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सुरज दादाराव शेडमाके रा. झुली असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने त्याच्या बहिणीच्या गावातील एका वर्ग ९ वी मध्ये शिकत असलेल्या मुली सोबत सुत जुळले होते. तुझे वय पुर्ण झाले की लग्न करु असे लग्नाचे अमिष दाखवून सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत शारिरीक संबध ठेवले. दरम्यान सदरच्या मुलीने लग्नाचा तगादा लावल्याने वेगवेगळी कारणे दाखवून लग्न करण्यास टाळाटाळ करत होता. अखेर सदरच्या मुलीने दि. २५ सप्टेंबर २०२३ ला पांढरकवडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरुन आरोपी विरोधात कलम ३७६ पोस्को प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. सदरच्या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक अंजली कानबाले करत आहे.

### जिल्ह्यातून जाणार हजारो कार्यकर्ते : जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर

## हैद्राबाद येथे होणार रिपाईचा 67 वा वर्धापन दिन

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वश्रेष्ठ भारतीय संविधान दिले. त्यांच्या महान विचारातून रिपब्लिकन पक्षाची संकल्पना निर्माण झाली. त्यांनी खुले पत्र लिहून रिपब्लिकन पक्षाची संकल्पना घटना लिहिली त्यानुसार 3 ऑक्टोबर 1957 रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची ऐतिहासिक स्थापना झाली. त्यानुसार आम्ही दरवर्षी पब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन साजरा करतो महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला रिपब्लिकन पक्षाचा ऐतिहासिक वारसा आम्ही चालवत आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. ज्यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरचे रिपब्लिकन संकल्पनेचा अभिमान आहे ज्यांचा महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विश्वास आहे. ज्यांना बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पटतो त्या सर्व भीमसैनिकांनी रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा कार्यकारणीच्या बैठकीत जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी आवाहन केले.

3 ऑक्टोबर हा बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा 67 वा वर्धापन दिन आहे. हा वर्धापन दिन हैदराबाद येथील नामपल्ली एक्जीबिशन ग्राउंड वर आयोजित करण्यात आला आहे. या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते उपस्थित राहतील असे जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी सांगितले. बैठकीस मार्गदर्शक म्हणून पश्चिम विदर्भ प्रदेशाध्यक्ष मोहन भोयर यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे सांगितले. यावेळी पक्षाचे नेते रामदास बनकर, धम्मपाल माने, गोविंद मेश्राम, नवनीत महाजन, अॅड. रजनी मेश्राम, युवक जिल्हाध्यक्ष अश्वजीत शेळके, महिला जिल्हाध्यक्ष तेजस्वी शिरसाठ, दिपाली मोहोड, करुणा शिरसाठ, चंदा ढवळे, रवि वासनिक, प्रभाकर जीवने, डिके हाणवते, बाळासाहेब जीवने,अॅड. धनंजय मानकर, अमित, राजेंद्र गवई, सुनील पडोळे, गोलू खंडारे व कार्यकर्ते उपस्थित होते.



## शोषकांच्या व्यवस्थेविरुद्ध ढाल व्हावी कविता : विजय ढाले

**विदर्भ कल्याण / नेर**

आज चारही बाजूंनी सृजनाची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू आहे. कुणी काय लिहावे याचे क्रूर नियोजन सुरू आहे. शब्दांवर आवळले जाणारे हे जुलुमी पाश शोषकांची व्यवस्था मजबूत करीत आहे.ही भीषण सांस्कृतिक गुंडगिरी लोकशाही साठी धोक्याची घंटा आहे. शोषितांचे जगणे हराम होत असताना कवी, लेखकांनी अधिक ताकदीने लिहिले पाहिजे शोषितांचे दुःख, दारिद्र्य, यातना संपुष्टात आणण्यासाठी शोषितांच्या व्यवस्थेविरुद्ध माझी कविता ढाल व्हावी असे प्रतिपादन प्रख्यात कवी विजय ढाले यांनी नेर येथे केले. त्यांच्या ' बिब्बा ' या बहुचर्चित काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.



एकूण 84 कवितांचा समावेश असलेल्या या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्ते संतोष अरसोड यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते राहुल सोनोने, कवी प्रवीण चांदोरे, अजय राऊत उपस्थित होते. विजय ढाले पुढे म्हणाले की, मी शेतीतील दुःख भोगले आहे.शेतकऱ्यांच्या वेदना मी रोज काळजात कोंडून घेतो. या वेदनेचा उत्स्फूर्त अविष्कार म्हणजे हा काव्यसंग्रह आहे. हा काव्यसंग्रह चळवळीसाठी लिहिला आहे. यातील प्रत्येक कविता ही चळवळ व्हावी ही माझी तळमळ आहे.काही तरी विधायक बदल होईल ही आशा मला जिवंत ठेवते आहे. बिब्बा जसं वेदनाहरण करतो तशीच कविता सुद्धा वेदनाहरण करीत असते. ज्यादिवशी या भूतलावरील वेदना संपेल त्यादिवशी मी कविता लिहणे बंद करेल.

दैनिक
# विदर्भ कल्याण
यवतमाळ जिल्हा विशेष
गुरुवार,
२८ सप्टेंबर २०२३

दैनिक विदर्भ कल्याण
घटना, घडामोडी, विश्लेषण, सदैव अपडेट राहण्यासाठी
जनतेच्या मनातील एकमेव आवाज
वाचत रहा
विदर्भ कल्याण.....

बातम्या, जाहीरात, व अंकासाठी संपर्क
भोजराज नागपुरे संपादक मो. ९४२२८२५५९७
राहुल वासनिक जिल्हा प्रतिनिधी, यवतमाळ
मो. ९८९०८७५२६१, ९४०४४८६३६१

## सेवानिवृत्त कर्मचा-यांची झेडपीवर धडक : मुख्य कार्यकारी अधिका-यांसोबत चर्चा

# उपदान मिळण्यासाठी केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी दबाव

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

सेवानिवृत्त कर्मचा-यांनी नियंत्रक प्राधिकारी, यवतमाळ तथा न्यायाधीश कामगार न्यायालय, यवतमाळ यांच्याकडे उपदान प्रदान अधिनियम १९७२ अंतर्गत उपदान मिळण्याकरीता तक्रारी न्याय प्रविष्ठ केलेल्या आहेत. सदर तक्रारी मागे घेण्यासाठी जिल्हा परिषदेतील अनेक विभागाच्या अधिका-यांकडून दंबाव तंत्राचा वापर होत असल्याचा आरोप सेवानिवृत्त कर्मचा-यांनी केला आहे. सेवानिवृत्त कर्मचा-यांनी जिल्हा परिषदवर धडक देवून मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या सोबत चर्चा केली.

सेवानिवृत्त कर्मचारी असून आम्ही सगळ्यांनी नियंत्रक प्राधिकारी, यवतमाळ तथा न्यायाधीश कामगार न्यायालय, यवतमाळ यांच्याकडे उपदान प्रदान अधिनियम १९७२ अंतर्गत उपदान मिळण्याकरीता तक्रारी न्याय प्रविष्ठ केलेल्या आहेत. त्यामध्ये काही प्रकरणात आम्हाला नियंत्रक प्राधिकारी, यवतमाळ यांच्या आदेशानुसार उपदानाची रक्कम ही व्याजासह प्राप्त झालेली आहे. परंतु असे असतांना आपणाद्वारे दि. ०७/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना प्रसिद्ध करून जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (प्रथम सुधारणा नियम) २०२३ प्रारूप नियम प्रसिद्ध करण्यात आलेले होते त्यानुसार आम्ही महाराष्ट्र शासनाकडे आक्षेप सुद्धा नोंदविलेले आहे. असे असतांना ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक यांनी दि. ११/०९/२०२३ रोजी शासन परिपत्रक काढून जिल्हा परिषदेमधील कार्यरत असणारे कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी राहणार नाही. त्यामुळे शासनाचे कोणतेही नियम अधिनियम या



कर्मचाऱ्यांना लागू होणार नाही असे परिपत्रक काढण्यात आलेले आहे. त्यानुसार ज्या कर्मचाऱ्यांनी या पूर्वी नियंत्रक प्राधिकारी यवतमाळ यांचे समक्ष तक्रार दाखल केलेली आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या गटाला बोलावुन जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, तसेच बाल कल्याण विभागातील अधिनस्त कर्मचारी हे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना फोन करून तुमची केस मागे घ्या, उपदानाची रक्कम ही परत करण्याबाबत दबाव तंत्राचा वापर होत आहे असा आरोपही केला आहे. मुख्य कार्यकारी अधिका-यांना निवेदन देतांना महेश दत्राणी, ज्ञानेश्वर पजगाडे, नामदेव ढोणे, सुभाष देशमुख, देवराव नवाथे, प्रल्हाद लाकडे, रामकृष्ण सपकाळ, दिवाकर ढोले, पंचभाई, तुकाराम उंबरकर, शामराव भालेराव, विजय गावंडे, देविदास गावंडे यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

**अन्यथा न्यायालयात दाद मागणार**

जिल्हा परिषद अधिनस्त असणारे आजी व माजी कर्मचाऱ्यांमार्फत ज्या कर्मचाऱ्यांच्या नियंत्रक प्राधिकारी यवतमाळ यांच्याकडे उपदाना संदर्भात तक्रारी न्याय प्रविष्ठ आहे. त्यांचा निकाल लागलेला आहे अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांना धाक दपट करून कोणत्याही प्रकारे पेंशन बंद करण्याच्या धमकी वजा आदेश न देण्याचे कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात यावे. अन्यथा संपूर्ण कर्मचा-या विरोधात न्यायालयामध्ये दाद मागु असा इशाराही सेवा निवृत्त कर्मचा-यांनी दिला आहे.

# शिवसेनेची एसडीओ कार्यालयावर धडक



**विदर्भ कल्याण / वणी**

केंद्रातील सत्ता या देशाचे भवितव्य धोक्यात आणू पाहत आहे. प्रचंड बेरोजगारी या देशात वाढत असताना सरकारी नोकरीचे खाजगीकरण करण्याचे षडयंत्र केंद्र आखत आहे आणि त्यांचा कित्ता राज्य सरकार गिरवित आहेत. त्यांनी काढलेल्या परीपत्रकात नौकरी संबंधी खाजगीकरण कंत्राटी पद्धतीने पदभरती करणे तसेच शासकीय शिक्षण संस्थेचे खाजगी करण करणे याबाबत काढलेले परीपत्रक त्वरीत रद्द करण्यात यावे. तसेच महाराष्ट्रातील शेतीच्या सोयाबीन पिकांवर 'येलो मोझाक या रोगांचा प्रादुर्भाव सर्वत्र आल्याने या देशातील पोषीदा हवालदिल झालेला आहे. तरी शासणाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई प्रयत्न पोटी ७५ हजार रु. हेक्टरी तात्काळ मदत दयावी तसेच तात्काळ पिक विमा पुर्ण लागु करुन सरसकट देण्यात यावा. तसेच वणी विधान सभा क्षेत्रासह पुर्ण राज्य परीवहन मार्गाला ग्रामीण मार्गाशी जोडल्या गेलेल्या मार्गाची पुर्ण दुरावस्था झालेल्या रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात यावे यासर्व मागणीला घेऊन शिवसेनेचे माजी आमदार जिल्हा प्रमुख विश्वास नांदेकर यांच्या नेतृत्वात वणी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी सह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनात सादर केले आहे. याप्रसंगी विक्रांत चचडा युवा सेना जिल्हा प्रमुख संजय निखाडे उपजिल्हाप्रमुख शिवसेना, गणपत लेडांगे तालुका प्रमुख-शिवसेना, सिमा आवारी, शरद ठाकरे, प्रसाद ठाकरे, संजय आवारी, सुधिर थेरे, चंद्रकांत घुगुल यासह पदाधिकारी व शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक निवासस्थान दुरुस्तीसाठी बारा लाख खर्च

## पंचायत समितीतील दलालाकडे शासकीय वाहन

## विड्रॉल कमिशनच्या नावाने सचिवांकडून लूट

**विदर्भ कल्याण / झरी**



येथील पंचायत समिती मधील दलालाच्या एका अधिकाऱ्याच्या गलथान कारभारामुळे पंचायत समिती चर्चेत आली आहे. पंचायत समिती मधील दलालाने उद्रेक केला आहे. सचिव पंचायत समिती मधील कर्मचारी हे त्रस्त झालेच परंतु हा दलाल शासकीय वाहनाचा वापर स्वतःसाठी करतो व शासकीय वाहन त्याच्या घरीच असल्याची सुद्धा माहिती मिळाली आहे. त्यामुळे सदर दलाल हा पंचायत समितीमध्ये आपला किती वर्चस्व आहे हे सुद्धा दाखवत आहे. तर या दलालाने एमआरजेच्या विहिरी बोगस दाखवून लाखो रुपये उचलण्याची सुद्धा माहिती मिळत आहे. दलालाने केलेल्या विहिरीचे सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे. पंचायत समितीमध्ये व्हिडिओ कमिशन च्या नावाने पाच वर्षांपासून तर दहा% पर्यंत वसुली केल्या जात असल्याची सुद्धा ओरड सचिव संघटना तसेच सरपंच गटातून होत आहे. या वसुलीच्या प्रकारामुळे सरपंच गट व सचिवांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

पंचायत समिती मधील एका निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी 12 लाख रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती आहे. हा खर्च कोणत्या फंडातून कोणत्या ठेकेदाराने केव्हा टेंडर केलं याची सखोल चौकशी होणे सुद्धा गरजेचे आहे. या निवासस्थानासाठी दोन ते तीन वेळा फंड काढून प्रत्येक खोलीमध्ये एअर कंडिशन, तार कंपाऊंड रंगोटी, सीसीटीव्ही बसविण्यात आला आहे. एवढा खर्च करण्यामागील कारण काय असा सुद्धा प्रश्न जनता उपस्थित करत आहे. त्या ठिकाणी दहा ते बारा शासकीय निवासस्थान असून, ते धूळ खात आहे. मग एक निवासस्थानावर एवढा खर्च का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या अधिकाऱ्या करिता सदर दलाला सर्व काही सुविधा पोहोचवत असल्याची माहिती आहे. या दलालामुळे पंचायत समिती, ग्रामपंचायत मध्ये हस्तक्षेप करीत असल्याची चर्चा आहे. तो स्वतःला वरिष्ठ अधिकारी समजून सर्वांना धमकावत असल्याचे बोलल्या जात आहे. याकडे वरिष्ठ अधिका-यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# मेरी मिट्टी मेरा देश, स्वच्छता हीच सेवा उपक्रमांतर्गत अमृत कलश यात्रा

**विदर्भ कल्याण / उमरखेड**

स्वतंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त केंद्र सरकार तर्फे संपूर्ण देशात ,मेरी मिट्टी मेरा देश , व स्वच्छता हीच सेवा ,अभियान राबविण्यात येत आहे तालुक्यातही या अभियानांतर्गत सर्व ग्रामपंचायतीत अमृत कलश यात्रा काढण्यात येत आहे. दि 1 ऑक्टोंबर पर्यंत या कलशाचे संकलन तालुका स्तरावर पंचायत समिती कार्यालय मध्ये करण्यात येणार असून सर्व गावांमधून गोळा करण्यात आलेल्या कलशाची माती एकत्रित करून तालुकास्तरावर प्रतिनिधी कलश तयार करण्यात येईल अशी माहिती पंचायत समिती उमरखेड येथील गटविकास अधिकारी प्रवीण कुमार वानखेडे यांनी दिली.




ज्या कुटुंबाकडे शेती आहे अशा कुटुंबातील सदस्यांकडून माती व ज्या कुटुंबाकडे शेती नाही अशा कुटुंबातील सदस्यांकडून एक चिमूटभर तांदूळ मातीच्या कलशात जमा करण्यात येत आहे तालुक्यात 1 सप्टेंबर पासून या अभियानात सुरुवात झाली असून आज पर्यंत सर्वाधिक ग्रामपंचायती मध्ये अमृत कलश तयार करण्यात आले आहे. तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीत, माझी माती माझा देश, स्वच्छता हीच सेवा या पंचायत समिती उमरखेड अंतर्गत अमृत कलश यात्रा काढण्यात आली. या कलश यात्रे प्रसंगी पंचायत समिती उमरखेड अंतर्गत, स्वच्छता हीच सेवा व मेरी मिट्टी मेरा देश या उपक्रमांतर्गत तालुक्यातील वेगवेगळ्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व गावातील प्रतिष्ठित नागरिक या कलश यात्रेत सहभागी होत आहे. अनेकांनी आपल्या घरातून कलशात माती गोळा करून हा उपक्रम साजरा करीत आहे. या यात्राद्वारे ग्रामपंचायत सचिव, पंचायत समितीचे कर्मचारी, बीआरसीचे कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व गावकरी मिरवणूक काढून याविषयी जनजागृती केली जात आहे. सदर उपक्रमात पंचायत समिती उमरखेड गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखेडे , जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व बी आर सीचे कर्मचारी अमृत कलश यात्रा महोत्सवात सहभागी होत आहे.

# मंगला मरापे यांना आंतरराष्ट्रीय आदर्श शिक्षिका पुरस्कार



**विदर्भ कल्याण / घाटंजी**

श्री. समर्थ विद्यालय घाटंजीच्या शिक्षिका व ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन च्या जिल्हाध्यक्षा तसेच घाटंजी येथील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. धुर्वे यांच्या सुविद्य सहचारिणी मंगला बळीराम मरापे यांना समता साहित्य अकॅडमीचा आंतरराष्ट्रीय आदर्श शिक्षिका पुरस्कार नागपूर येथे नियोजन विभागाचे अप्पर सचिव नंदकुमार राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी उत्तर प्रदेशचे माजी कायदामंत्री प्रा. राजन वर्मा, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय अध्यक्ष प्रा. मधुकर उईके उपस्थित होते. मंगलाताई मरापे यांनी श्री. समर्थ विद्यालय घाटंजी च्या महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. तसेच स्काऊट-गाईड कॅम्प, रस्ते सुरक्षा सप्ताह, वृक्षारोपण इत्यादी उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग असतो. सौ. मरापे मॅडम ह्या हिंदी कोविद परीक्षा उत्तीर्ण असून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ द्वारा संचालित ग्रामगीता जीवन विकास परीक्षेमधील "ग्रामगीता रत्न "ही परीक्षा उत्तीर्ण आहेत. अशा बहूगुणसंपन्न आपल्या आवडत्या शिक्षिकेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. समर्थ विद्यालय घाटंजी च्या इयत्ता 10वी चे विद्यार्थी चि. आनंद श्रीकांत राठोड, ओम पिल्लारे, ऋषिकेश प्रवीण वानखेडे, आराध्य कुमरे यांनी छोटीशी भेटवस्तू देऊन अभिनंदन केले.

# राग आणि मानसिक आरोग्य

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

राहुल आणि विद्या यांच्या नात्याला जवळजवळ सहा वर्षे झाली होती. ते दोघेही जॉब करत होते. ज्यावेळी लग्नाचा विषय निघाला तेव्हा विद्याने राहुलला सगळ्या गोष्टी मनमोकळेपणाने सांगितल्या की तिला लग्नानंतर देखील जॉब करायचा आहे. राहुलचा तिला पूर्णपणे सपोर्ट होता. बघता बघता त्यांचं लग्न झालं. तिने विचार केला, असंही लग्नानंतर काही दिवस सुट्टी घ्यावी लागली असती तर आता तो वेळ ती नवीन जॉब शोधायला घालवेल आणि सोबत घरच्यांना देखील वेळ देता येईल.सगळ्या गोष्टी नवीन असल्यामुळे विद्याला पण हे सगळं आवडत होतं. रोज नवीन पदार्थ बनवणं, राहुल सोबत छान वेळ घालवण, सासू -सासऱ्यांची काळजी घेणं. हे सगळं ती खूप मनापासून करत होती.पण जेव्हा केव्हा ती एकांतात बसलेली असे तेव्हा तिला अचानक जॉब विषयी किंवा ती आधी काय काम करायची, नवीन गोष्टी शिकण्यासाठीचा तिचा उत्साह, बाहेर जाऊन काम करण्याची आवड, तिच्या क्षेत्रामध्ये नवीन गोष्टींचा अभ्यास करण्याची आवड हे आठवून तिची चिडचिड होत असे. तिला कळत नसे की काय करावं? तिची चलबिचल होत असे! तिचा राग इथं पर्यंत गेला कि तिने रागात बोलून टाकलं कि लग्न उगाच केलं त्यामुळे असं सगळं होत आहे.

राग येणं हे अगदी साहजिक आहे. पण त्यासोबत आणखीन कोणत्या भावना आहेत ज्या आपल्याला अश्या कठीण परिस्तिथी मध्ये अनुभवायला येतात याविषयी आपण जागरूक असायला हवं. खूपदा राग हा भीतीतून निर्माण झालेला दिसून येतो. जस,विद्याला जॉब ठरवलेल्या वेळेत न मिळाल्यामुळे तो न मिळण्याची भीती होती परिणामी त्याच रूपांतर रागात झालं.कधी कधी मनातल्या गोष्टी सांगितल्या नाही खूप काळ,तरी देखील राग अनावर होऊ शकतो. जस कि विद्याने नेमकं तिला काय वाटत आहे हे बोलून न दाखवल्यामुळे तिने अशी काही विधाने केली ज्यामुळे बाकीच्यांची मने दुखावली गेली.

ह्या सगळ्यात तिला राहुल कडून अशी अपेक्षा होती कि त्याने तिला समजून घ्यावं . तिचा राग त्याने समजून घ्यावा.राहुल जेव्हा घरी यायचा तेव्हा ती त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायची. पण राहुल तिला फक्त एवढंच म्हणायचा की, "अगं मिळेल नवीन जॉब होईल सगळं ठीक."पण हे ऐकून विद्याला तात्पुरतं बरं वाटायचं पण राहुल तिला पूर्णपणे समजून घेत नाही असं वाटायचं. तिच्या मनात जो गोंधळ उडालेला आहे त्या विषयीची चिडचिड ती तिच्या रोजच्या कामावर काढत आहे. पण पुन्हा त्यावरती फार काही सुचत नसल्यामुळे ती काही करू शकत नव्हती आणि मग पुन्हा आहे तेच रोजचे चक्र चालूच राहायचे.

अपेक्षा रागाच्या नाण्याची दुसरी बाजू आहेत. जेव्हा आपल्याला एखाद्या व्यक्तीवर किंवा परिस्थितीवर राग येतो तेव्हा तो व्यवस्थितपणे व्यक्त न करता आल्यामुळे बऱ्याचदा आपल्याला रडू कोसळतं आणि त्यामुळे अशी भावना येते की इतकं करून देखील त्रास मलाच होत आहे. म्हणून आपल्याला काय वाटत आहे हे स्पष्टपणे बोलण्याने समोरच्या व्यक्तीला देखील आपल्या भावना समजून घेण्यास मदत होते.

म्हणता म्हणता सात-आठ महिने निघून गेले. विद्याने बऱ्याच ठिकाणी नोकरीसाठी अर्ज देखील केकाता होते पण तिला फारसा काही चांगला प्रतिसाद येत नव्हता. त्यामुळे देखील तिचा राग अनावर होत चालला होता.तिने हा समज करून घेतला की घरातल्या कामांमुळे आणि आहे तो जॉब सोडल्यामुळे तिला ह्या सगळ्या गोष्टी फेस करायला लागत आहे. तिने असं ठरवलं की आता जो मिळेल तो जॉब करायचा भले तो तिच्या फिल्ड मधला नसला तरी चालेल.ह्यातल्या काहीच गोष्टी न घडल्यामुळे विद्याला हतबलता जाणवत होती. असं देखील होत, आपल्याला अनेकदा अंदाज येत नाही की आपण नेमकं रागावलो आहोत की आपल्याला भीती वाटते आहे? की माझ्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे माझी चिडचिड होती आहे? जेव्हा आपल्याला लक्षात येतं की नेमकं मी आता कोणत्या भावनेमधून जात आहे तेव्हा आपल्याला आपल्या रागावर काम करणं सोपं जातं.रागाचा परिणाम हा आपल्या शरीरावर तर होतोच तसेच आपल्या जवळच्या नात्यांवर,आपल्या दैनंदिन जीवनावर देखील होतो. त्यामुळे आपण रागावर काम कसे करू शकतो याचा विचार केला पाहिजे.

जसे की बोलण्यापूर्वी काही वेळ घेऊन विचार करून बोलणे, जेव्हा आपण शांत होऊ तेव्हा व्यक्त होणे, नियमितपणे व्यायाम करणे, डायरी लिहिणे, फिजिकल ऍक्टिव्हिटी द्वारे राग काढणे, दिवसातला काही वेळ स्वतःसाठी काढणे, सगळ्यात महत्त्वाचं जेव्हा तुम्ही सगळ्या गोष्टी ट्राय करून देखील राग का येतोय, तो कसा हाताळावा हे लक्षात येत नाही येत तर कॉल करा मुक्ता मानसिक स्वास्थ्य हेल्पलाईनला (७८८-७८८-९८८२).



गायत्री नगर गणेश उत्सव मंडळ आर्णी

# शुक्रवारी दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियान

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

जिल्ह्यामध्ये 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानांतर्गत शुक्रवारी २९ सप्टेंबर रोजी लोहारा एमआयडीसीतील चिंतामणी या खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे 'दिव्यांग मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळणार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री संजय राठोड तर उद्घाटक म्हणून अभियानाचे अध्यक्ष आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू उपस्थित राहणार आहे. सोबतच वक्फ बोर्डाचे अध्यक्ष तथा आमदार डॉ. वजाहत मिर्झा, खा. भावना गवळी, खा. हेमंत पाटील, आ. ॲड निलय नाईक, आ. किरण सरनाईक, आ. धिरज लिंगाडे, आ. प्रा. डॉ. अशोक उईके, आ. मदन येरावार, आ. संजीवरेड्डी बोदकुरवार, आ. डॉ. संदिप सुर्वे, आ. नामदेव ससाणे, आ. इंद्रनिल नाईक, विभागीय आयुक्त डॉ.निधि पाण्डेय, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलिस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी आवश्यक मुळ कागदपत्र व छायांकित प्रतीसह उपस्थित राहून या अभियानाच्या माध्यमातून विविध योजना व आवश्यक प्रमाणपत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# मोकाट श्वानांनसाठी एक मदतीचा हात

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविदयालय येथील राष्ट्रीय सेवा योजना व युनिटी फॉउंडेशन तर्फे रस्त्यावरील मोकाट श्वानांन साठी एक मदतीचा हात म्हणून राष्टीय सेवा योजना वर्धापण दिन वेगळ्या पद्धतीने प्राचार्य डॉ वर्षा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात साजरा करण्यात आला.

रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. वैशाली मेश्राम ह्यांनी विद्यार्थ्याना समाजसेवेसोबत मुक्या जनावरांची सेवा हे देखील राष्ट्रीय- सेवा योजनेचे एक व्रत आहे हे सांगुन ही जनावरे




आपले मित्र होवू शकतात असे सांगीतले तर सहकार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन जयस्वाल ह्यानी विद्यार्थ्यांना मुक्या जनावरांची सेवा म्हणजे खरी ईश्वर सेवा होय हे सांगुन प्रोत्साहित केले. दाते कॉलेज चौक ते शिवाजी गार्डन परिसरातील सर्व रस्त्यावरील मोकाट श्वानांना एक मदतीचा हात म्हणून त्यांच्या चाऱ्या पाण्याची सोय करण्यात आली, युनिटी फॉउंडेशन चे अध्यक्ष प्रतीक तराळकर ह्यांनी विद्यार्थ्यांना मुक्या प्राण्यांची सेवा कशी करायची हे प्रात्यक्षिका व्दारे सांगीतले तर सचिव अमृता टेवाणी ह्यांनी विदयार्थ्यांना मुक्या प्राण्यांवर औषधोपचार कसे करायचे हे सांगुन घरच्या घरी करता येणाऱ्या उपचाराची माहिती दिली. सदर कार्यक्रमा करीता रोहण गायकवाड, रश्मी परसराम, अभय इंगोले, रोशन गायकवाड, स्नेहल येड्डावार, जोसना भोयर, तनिशा छापेकर, प्रशिक भस्मे, निकिता मेश्राम, अर्थराज राठोड, अक्षय दडांजे, विठ्ठल कुरहाळकर, पूजा जाधव, अदिती सोनोने, गौरी साहारे, तुषार दडांजे, ज्ञानेश्वरी ठवकर, विशाखा ठाकरे हे सर्व प्रत्यनशील ठरले.

दैनिक
# विदर्भ कल्याण
यवतमाळ जिल्हा विशेष
गुरुवार, २८ सप्टेंबर २०२३

दैनिक विदर्भ कल्याण
घटना, घडामोडी, विश्लेषण, सदैव अपडेट राहण्यासाठी
जनतेच्या मनातील एकमेव आवाज
वाचत रहा
विदर्भ कल्याण.....

बातम्या, जाहीरात, व अंकासाठी संपर्क
भोजराज नागपुरे संपादक मो. ९४२२८२५५९७
राहुल वासनिक जिल्हा प्रतिनिधी, यवतमाळ
मो. ९८९०८७५२६१, ९४०४४८६३६१

## पाणलोट विकास घटक योजनेसाठी 143 कोटींचा निधी : ना. संजय राठोड

विदर्भ कल्याण / यवतमाळ

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत पाणलोट विकास घटक 2.0 ही योजना मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र स्वयंसहाय्यता गटांना वितरणासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्याकडे 143 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली आहे.

मंत्री राठोड म्हणाले, राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक 2.0 ही योजना मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचे निधी प्रमाण केंद्र राज्य शासन अनुक्रमे 60 ल 40 टक्के असे असून, योजनेचे प्रकल्प मूल्य 1335.56 कोटी इतके आहे. हा प्रकल्प राज्यातील 30 जिल्ह्यांतील 102 तालुक्यातील 1603 गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील एकूण 5,65,186 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.



या योजनेंतर्गत उपजीविका घटकांतर्गत प्रकल्प मूल्याच्या 15 टक्के निधीची तरतूद असून, उपजीविका हा घटक ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या यंत्रणेमार्फत त्यांच्या आर्थिक निकषानुसार राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी मृद व जलसंधारण विभागाकडून पात्र स्वयं सहाय्यता गटांना निधी वितरणासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्याकडे 143 कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उपजीविका घटक अंतर्गत प्रत्येक पाणलोट प्रकल्पात फिरता निधी मिळण्यास पात्र स्वयं सहाय्यता गटांना 30 हजार व प्रभाग संघामार्फत समुदाय गुंतवणूक निधी मिळण्यास पात्र स्वयं सहाय्यता गटांना 60 हजार याप्रमाणे वितरित करण्यात येणार आहे.

प्रत्येक प्रकल्प क्षेत्रात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत प्रभाग संघ व स्वयं सहाय्यता गटांना निधी वितरित करण्यात येणार असून पात्र स्वयं सहाय्यता गट व प्रभाग संघ यांना निधी पाणलोट समितीच्या शिफारशीने वितरित करण्यात येईल.

## पांढरकवडा येथील वृद्धाश्रमात अन्नदान



विदर्भ कल्याण / पांढरकवडा

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, म्हणून वाढदिवस हा सामाजिक उपक्रमाने साजरा व्हावा या हेतुने पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रविण लिंगाडे यांनी आपल्या मुलगी सानवी हीचा वाढदिवस स्व इंदुबाई भगवानदास बोरले वृद्धाश्रमात साजरा करुन भोजनदान दिले.

'डिजे'च्या तालावर मोठमोठ्या हॉटेलमध्ये पार्टीचे नियोजन करून वाढदिवस साजरे करतांना पहायला मिळते. यावर लाखो रुपयांची उधळपट्टीही होते. याला बगल देत ठाणेदार प्रवीण लिंगाडे यांनी आपल्या मुलीचा वाढदिवस अनाथ असलेल्या वृद्धाश्रमात साजरा करण्याचे ठरविले. आजचा दिवस हा वृद्धासमवेत घालवून त्यांच्या दु:खावर फुंकर घालून आनंदी वातावरण निर्माण केले.

यावेळी ठाणेदार प्रवीण लिंगाडे, अरुण लिंगाडे, सुरेखा लिंगाडे, मयुरी लिंगाडे, गजानन नव्हाते, लखन पुरोहित, सुरेश तलमले, विशाल राऊत, प्रल्हाद ठाकरे, सुमित पोटपेल्लीवार, राजेश गैनीवार, मुन्ना, स्व इंदुबाई भगवानदास बोरेले वृद्धाश्रमचे अध्यक्ष अनिल बोरेले आदींसह वृद्धाश्रमातील वृद्ध उपस्थित होते.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मासिक सभा

विदर्भ कल्याण / यवतमाळ

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची आज जिल्हाधिकारी तथा परिषदेचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली मासिक सभा पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी मागील सभेतील ग्राहकांच्या तक्रारींचा आढावा घेतला व त्या लवकरात लवकर निकाली काढून त्याचा कार्यवाही अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या तसेच आज झालेल्या सभेतील तक्रारी प्राप्त झाल्यापासून सात दिवसात निकाली काढाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात ही बैठक झाली. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी प्रमोद सिंह दुबे, जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन, अन्न औषध प्रशासन, महावितरण, पाटबंधारे आदी विभागाचे अधिकारी तसेच समितीमधील अशासकीय सदस्य डॉ. नारायण मेहरे, ॲड राजेश पोहरे, शेखर बंड, प्रमोदकुमार बाजोरीया, बिरेंद्र चौबे, कैलासचंद्र वर्मा, संतोष डोमाळे, प्रकाश बुटले आदी उपस्थित होते.यावेळी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील शासकीय सदस्य डॉ. नारायण मेहरे यांनी जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करुन मास विक्रीची दुकाने सुरु करण्यात आली. रस्त्यावरील वाहतुक प्रभावित होते.

## स्वच्छता मित्रांची आरोग्य तपासणी

विदर्भ कल्याण / यवतमाळ




स्वच्छता मित्र म्हणून शहराची स्वच्छता करणारे सफाई कामगार, पालिका प्रशासनाच्या आरोग्य विभागाचे महत्त्वपुर्ण अंग असुन त्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे लक्ष दिले पाहिजे. असे आवाहन प्रशासक दादाराव डोल्हारकर यांनी केले.

स्थानिक नगरभवनात इंडियन स्वच्छता लिग आणि स्वच्छता पंधरवाडा अभियानांतर्गत दि. २६ सप्टेंबर रोजी आयोजित सफाई कामगार आरोग्य शिबिरात मार्गदर्शन मुख्याधिकारी बोलत होते. प्रारंभी निमाचे अध्यक्ष डॉ. दिनेश चांडक यांनी शिबिरार्थी कामगारांना सुदृढ आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, प्रत्येकाने भरपूर पाणी प्यावे. मधुमेह व रक्तदाब असणाऱ्यांनी वैद्यकीय सल्ल्यानुसार नियमीतपणे औषधे घ्यावीत. लहानसहान दुखनं अंगावर काढु नयेत. त्वरीत वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधे घ्यावीत. आवश्यक चाचण्या वेळेवर केल्यास गंभीर आजारांवरही मात करता येते. शारीरिक व्याधींकडे कानाडोळा करु नये. असा सल्ला डॉ. चांडक यांनी दिला.डॉ. दिनेश चांडक व त्यांच्या चमुतील डॉ. आनंद बोरा, डॉ. मंगेश अडावकर, डॉ.सौ. विद्या पाचकवडे, डॉ. प्राची नेवे, डॉ.सौ. मंगला निकम, डॉ. विजय अग्रवाल, डॉ. शिप्रा राठोड, डॉ. सौ. गायनर, डॉ. जयश्री कविश्वर, डॉ.कविता करोडदेव, डॉ. अंजली गवार्ले, इत्यादींनी आरोग्य तपासणी शिबिरात शेकडो कामगारांची तपासणी करून वैद्यकीय मार्गदर्शन केले व शिबिरार्थींना औषधे घेण्याचा सल्ला दिला. संचलन सुनिल वासनिक यांनी केले. तर आभार न.प. संगणक अभियंता नागेश कपाटे यांनी मानले.

## गणेश विसजर्नापुर्वी रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा

विदर्भ कल्याण / उमरखेड

जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जलजीवन योजनेच्या कामासाठी उमरखेड तालुक्यात येत असलेल्या लोहरा खुर्द या गावातील मुख्य रस्त्यावर अनेक ठिकाणी तोडफोड केली. जलजीवन योजनेच्या पाईपलाईनची कामे करण्यात आली. परंतु तोडफोड केलेल्या रस्त्याची कुठल्याही प्रकारे डागडुजी न करता या कामाच्या कंत्राटदाराने व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्याने येथील नागरिकांना वेठीस धरले आहे. तसेच गणेश विसर्जन करण्यासाठी जाव्या लागणाऱ्या रस्त्यावर कंत्राटदाराकडून मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आल्यामुळे या मार्गावरून गणेश विसर्जन कसे करावे या संभ्रमात गणेश मंडळाचे कार्यकर्ते पडले आहे. याबाबत शंभूराजे गणेश मंडळाचे अध्यक्ष राजू पाटील शिंदे यांनी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा उपविभागाकडे निवेदन दिले. तोडफोड केलेल्या रस्त्याची गणेश विसर्जनापूर्वी दुरुस्ती करून देण्याची मागणी केली आहे. ट्रॅक्टरवरून गणपती विसर्जनासाठी नेत असताना ट्रॅक्टर पलटी होऊन मूर्तीची विटंबना होऊ शकते. जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने कंत्राटदाराकडून तात्काळ गणेश विसर्जनापूर्वी ह्या रस्त्यांची दुरुस्ती करून देण्याची मागणी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## पारवेकर महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस

विदर्भ कल्याण / घाटंजी




पारवा येथील बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण यादव होते. तर प्रमुख वक्त म्हणून प्रा. डॉ. जगदिश हेंडवे उपस्थित होते. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेच्या पूजनानंतर मान्यवरांनी विद्यापीठाचे गीत गायन केले. या प्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून प्रा. यादव, वक्ते प्रा. डॉ. जगदिश हेंडवे, प्रा. डॉ. संदिप देसाई, प्रा. डॉ. अभय चदिकर आणि कार्यक्रम अधिकारी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गजानन लोहवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.लोहवे यांनी करून राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल सविस्तर माहिती सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवेचे तत्व रुजावे आणि महाविद्यालयीन विद्यार्थी समाजाच्या सेवत रूजू व्हावा, समाजाकडे पाहण्याची दृष्टी सकारात्मक बनावी आणि त्यासाठी त्याने काही योगदान दयावे. याकरिता संस्कार करणारी योजना म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. असे मत प्रा.लोहवे यांनी प्रास्ताविकातून मांडले. तर राष्ट्रीय सेवा योजना ही माणूस घडविणारी शाळा आहे. असे मत प्रा. डॉ. जगदिश हेंडवे यांनी व्यक्त केले. प्रा. यादव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची सखोल माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन लोहवे यांनी केले. बी. ए. भाग १, २ आणि ३ चे मोठया प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

## येलो मोझॅकचे बळी ठरलेल्या शेतक-यांना सरसकट मदत द्या

विदर्भ कल्याण / यवतमाळ

संततधार पावसामुळे यवतमाळ जिल्हयातील सोयाबीन चे पीक संकटात आले आहे. येलो मोझॅक रोगामुळे ऐन शेंगधरणीच्या वेळेवर सोयाबीनची झाडे वाळत आहे. गेल्या काही वर्षापासून संकटाचा सामना करणारे शेतकरी येलो मोझॅकच्या आक्रमनामुळे पुन्हा संकटात सापडले आहे. सोयाबीन चे काहीच उत्पन्न होण्याची शक्यता नसल्याने कापसावर लाल्या रोग आल्यास जशी मदत दिली जाते तशीच मदत जिल्हयातील सोयाबीन शेतक-यांना देण्याची मागणी प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस देवानंद पवार यांनी सरकारकडे केली आहे.



यवतमाळ जिल्हयात कापूस तसेच सोयाबीनची सर्वाधिक लागवड केली जाते. यावर्षी सुध्दा शेतक-यांनी कापसाव्यतिरिक्त सोयाबीनची लागवड मोठया प्रमाणात केली आहे. या खरीप हंगामात अर्ली व्हेरायटी सोडून इतर सोयाबीनवर मोठया प्रमाणात येलो मोझॅक चे आक्रमन झाले आहे. या रोगाने सोयाबीनची झाडे वाळत आहे. शेंगधरणीची वेळ असल्याने रोगाचा प्रादुर्भाव घातक ठरत आहे. विशेष म्हणजे कृषी विभागाच्या अधिका-यांनी फुले संगम नावाची सोयाबीनची व्हेरायटी शेतक-यांना वाटली होती. त्यामुळे शेतक-यांनी सुध्दा विश्वास ठेऊन याच व्हेरायटीची मोठया प्रमाणात लागवड केली. आज मात्र ही व्हेरायटी रोगाला बळी पडली आहे. अशा गंभीर संकटात शेतकरी मात्र दिशाहीन झाल्याचे दिसून येत आहे. कृषी विभाग तसेच विद्यापीठाचे शास्त्रज्ञ शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात अपयशी ठरले आहे. लागवडीचा खर्च वाढलेला असतांना आता आलेल्या या संकटामुळे शेतक-यांना पुन्हा औषधाचा खर्च करावा लागत आहे. खर्च जास्त आणि उत्पादन कमी होण्याची शकयता असल्याने अनेक शेतकरी सोयाबीनची झाडे उपटून फेकत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकारने तातडीने पंचनामे करुन सोयाबीन उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 50 हजाराची मदत देण्याची मागणी देवानंद पवार यांनी केली आहे.

### न्यायालयात दाद मागणार

जिल्हयातील शेतक-यांचे अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले. सरकारने मात्र अजुनही शेतक-यांना मदत दिलेली नाही. आता तर सोयाबीन उत्पादक शेतकरी सुध्दा उदध्वस्त झाला आहे. त्यामुळे सरकारने पंचनामे करुन मदत न दिल्यास कॉंग्रेसच्या वतीने आंदोलन करुन सरकारला जाब विचारण्यात येईल. एवढेच नव्हे तर सोयाबीन कंपनी, कृषी विभागाचे अधिकारी तसेच कृषी विक्रेते यांच्यावर न्यायालयात खटले भरु असा इशारा देवानंद पवार यांनी दिला आहे.

## मुंबई येथे राज्यस्तरीय सफाई कामगार उत्थान परीषद

विदर्भ कल्याण / यवतमाळ

यवतमाळ जिल्हयातील सफाई कामगारांचे अनेक ज्वलंत प्रश्न प्रलंबित आहे. सतत मागण्यांचा पाठपुरावा करुनही सरकारने याकडे लक्ष दिले नाही. दरम्यान मुंबई येथे राज्यस्तरीय सफाई कामगार उत्थान परीषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीषदेत सफाई कामगारांचे अनेक प्रश्न उपस्थित करुन त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असून वाल्मीकी समाज बांधवांनी परीषदेत सहभागी होण्याचे आवाहन जन आधार सेवा फाऊंडेशन चे विदर्भ समन्वयक ओम तिवारी यांनी केले आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई विद्यापीठ, जन आधार सेवा फाऊंडेशन, सफाई कामगार इकोनॉमिक अँड वेलफेयर फाऊंडेशन, अखिल भारतीय वाल्मिकी समाज विकास परिषद आणि सहयोगी संस्था यांच्या वतीने सफाई कामगारांच्या ज्वलंत प्रश्न व समस्यावर उपाय शोधून सन्मानजनक रोजगार आणि त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व मानसिक सबलिकरणासाठी राज्यस्तरीय सफाई कामगार उत्थान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीषद सर कावसजी जहांगीर, दीक्षांत सभागृह मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस येथे दिनांक 30 सप्टेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता आयोजित केली आहे. या परीषदेला अध्यक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्घाटक ना.सुरेश खाडे (कामगार मंत्री), प्रमुख अतिथी एम. व्यंकटेशम (अध्यक्ष, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग,नवी दिल्ली), गोविंद राज, प्रभातकुमार सिंग (व्यस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास महामंडळ, नवी दिल्ली), बिपीनकुमार श्रीमाळी (व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. मुंबई) हे उपस्थित राहणार आहे. मुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्यामुळे सफाई कामगारांचे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे. सफाई कामगारांना स्थायी नियुक्तीपत्र देण्यात यावे, घरकुल उपलब्ध करुन द्यावे, चेजींग रुम, सुरक्षा साहित्याचा पुरवठा, पर्याप्त साहित्य पुरवठा यासह विविध प्रश्न उपस्थित करण्यात येणार आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्हयातील सफाई कामगारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन परीषदेचे विदर्भ समन्वयक ओम तिवारी यांनी केले आहे.

## 3 ऑक्टोबरला लोकशाही दिन

विदर्भ कल्याण / यवतमाळ

महात्मा गांधी जयंती दिनी शासकीय सुट्टी असल्यामुळे २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय लोकशाही दिन सभेचे आयोजन मंगळवार दि. ३ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मात्र, ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या सोमवारी २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती येत असल्यामुळे या दिवशी लोकशाही दिन सभेचे आयोजन होणार नाही. त्या ऐवजी दि. ३ ऑक्टोबर रोजी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे होणार आहे.

## आदिवासी आरक्षण धनगर जातींचा समावेश नको

विदर्भ कल्याण / पांढरकवडा

आदिवासी बचाव संघर्ष समितीच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी केळापूर यांच्या मार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.



आदिवासी आरक्षण हे सविंधानीक हक्क असून त्यामध्ये कोणत्याही धनगर अथवा अन्य जातीची घुसखोरी करू नये. धनगर समाजाचा आदिवासी आरक्षण मध्ये समावेश करण्यात यावा म्हणून आपल्याकडे व शासन स्तरावर वारंवार मागणी केली जात असून ती बेकायदेशीर आहे. असा आरोप पांढरकवडा आदिवासी बचाव संघर्ष समितीचे नेते बबनराव सोयाम भाऊराव मरापे यांनी केला आहे. धनगर व घनगड या दोन्ही भिन्न जाती आहेत. त्यामुळे धनगरांना अनुसूचित जातीच्या आरक्षण देता येणार नाही, अस स्पष्ट सविस्तर अहवाल टीस (टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोसिएल सायन्स) ने अहवाल महाराष्ट्र शासनानाकडे दिलेला आहे, असे असताना धनगरांना अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात यावे अशी मागणी अत्यंत चुकीची आहे. आदिवासीची संस्कृती, परंपरा, राहणीमान, जीवनशैली, भौगोलिक परिस्थिती तसेच विशिष्ट भूप्रदेशात वास्थवात असलेला व स्वतंत्र बोली भाषा असलेला समाज आहे. आदिवासी संस्कृती ही धनगर समाजाशी अजिबात मिळती जुळती दिसत नाही. आदिवासी समाजाचा खऱ्या अर्थाने ७% टक्के आरक्षण अद्यापही मिळालेले नाही. खोट्या व बनावट जात प्रमाणपत्रच्या आधारांवर बोगस आदिवासी हे खऱ्या आदिवासी च्या लाखो नोकऱ्या हडप बडकवल्या आहेत. गैरआदिवासीनी अनेक क्षेत्रांत आदिवासी आरक्षणाचा गैर फायदा घेतलेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचा होणाऱ्या प्रगती मध्ये अडथळा निर्माण होत आहे. आदिवासीच्या आरक्षणात घनगर समाजाचा समावेश करू नये अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी बचाव संघर्ष समितीच्या वतिने २ ऑक्टोंबर महात्मा गांधी जयंतीच्या धरणे आंदोलन करण्यात येईल अशी माहिती आदिवासी बचाव संघर्ष समितीचे संयोजक बंडू सोयाम अंकित नैताम सुवर्णा वरखडे यांनी दिली आहे. निवेदन देतांना नागोराव गेडाम, गणेश तोडसाम, विनोद कन्नाके, अक्षय सिडाम, संतोष पेंदोर, कुणाल कुडमेते, अजय कुंमरे, सागर मडावी , योगेश शेडमाके, गोकुळ तोडसाम, विलास घोडाम, शेषराव मेश्राम, विलास जुमनाके, वाघू परचाके, माधव सोयाम, नागोराव इंचोळकर, रवी कनाके, मिथुन सोयाम, रमेश गेडाम, लखन मेश्राम उपस्थित होते.

## शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

विदर्भ कल्याण / यवतमाळ

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी वारंवार मुदतवाढ देण्यात आली. अद्यापपर्यंत काही विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले नाही. त्यामुळे आता शासनाकडून दि. ३० सप्टेंबर पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इमाव, विजाभज, विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबविण्यात येते.

## जाळीत अडकलेल्या अजगराची सुटका

विदर्भ कल्याण / आर्णी



आर्णी तालुक्यातीलजवळा लोणी या गावातील नागरिक बळीराम पवार याच्या शेतातील बकरी कोंबड्या च गोठ्यात जाळीमध्ये अजगर अडकला असल्याची माहिती MH 29 हेल्पिंग हैंड चे संस्थापक अध्यक्ष निलेश मेश्राम यांना माहिती मिळाली होती. त्यांनी आर्णी तालुक्यातील एम एच 29 हेल्पिंग हैंड राम पवार, हरीश पारधी यांना घटनस्थळी पाठवले.

अजगर जातीचा ( कक्ष1) मध्ये येणारा अंदाजे 6 फूट बिनविषारी अजगर पकडला. सापची वनविभाग मध्ये नोंद करून त्या सापाला. वनपरिक्षेत्र अधिकारी वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले. यावेळी वनविभागाचे राजेश चव्हाण राम पवार, हरीश पारधी, अमीर खान, धीरज मुजमुले, ओम सवाई, प्रथम राठोड, हर्षदीप वानखेडे, जय गिरी, अरबाज शेख, कृष्णा वानखडे, चित्तू वानखेडे हे हजर होते. कुठेही साप किंवा इतर वन्यजिव आढळून आल्यास जवळील वनविभागाच्या कार्यलय, कर्मचारी किंवा आमच्या या जिल्हा हेल्पलाईन क्र 9850577616 अथवा आर्णी तालुका अमिर खाण 9325475292, संपर्क साधावा अशे आव्हान करण्यात आले.